महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

दुरध्वनी क्रमांक - 0257-2220152 ई मेल - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले** :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020

4. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/253, दिनांक 01 जून, 2020

5. महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक कोविड-2020/प्रक्र 87/वैसेवा-3, दिनांक 15 जुलै, 2020

-----0000-----

क्र दंडप्र-01/कावि/2020/ 366

दिनांक 16 जुलै, 2020

## आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्यातील कोरोना विषाणू चाचणी प्रयोगशाळांच्या कामकाजात अधिकाधिक सुसुत्रता आणणे व सदर प्रयोगशाळांचे कामकाज अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हास्तरावर नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबत उपोद्घातात नमूद दिनांक 15 जुलै, 2020 च्या शासन निर्णयानुसार निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्याअर्थी, मी **अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन कोरोना विषाणू चाचणी प्रयोगशाळांच्या कामकाजात अधिकाधिक सुसुत्रता आणणे व सदर प्रयोगशाळांचे कामकाज अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी **श्री बी. एन. पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव** यांची **नोडल अधिकारी** म्हणून नियुक्ती करीत आहे.

तसेच नोडल अधिकारी यांना सहाय्य करणेकामी **श्री तुकाराम हुलवळे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव** यांची **सहायक नोडल अधिकारी** म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिकारी यांनी शासन निर्णयात दिलेल्या निर्देशानुसार खालील प्रमाणे कामकाज करावे.

1) नोडल अधिकारी यांनी जिल्हयातील कोरोना विषाणू चाचणी प्रयोगशाळांची संख्या वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे.

2) अशा प्रयोगशाळांच्या चाचण्यांची क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, जेणे करुन प्रयोगशाळा निहाय चाचण्यांची एकुण संख्या अधिकाधिक वाढेल, या प्रयोगशाळा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित राहतील याची खबरदारी घेणे.

3) संबंधित रुग्णालयांकडून प्रयोगशाळांकडे रुग्णांचे घेण्यात आलेले नमूने वेळेवर पोहोचतील याबाबत खातरजमा करणे.



4) रुग्णांचे नमूने घेतांना विहीत नमुन्यातील फॉर्म मध्ये रुग्णांचे नाव, पत्ता तसेच संपर्क क्रमांक अचूकपणे भरण्यात येत आहेत याची खातरजमा करणे.

5) संबंधित रुग्णालय व प्रयोगशाळा यांच्यातील समन्वय अधिकाधिक प्रभावी राहण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे.

6) जिल्हयातील सर्व प्रयोगशाळा पूर्ण क्षमतेने सर्व दिवशी 24 तास कार्यरत राहतील याची दक्षता घेणे, नमूने प्राप्त झाल्यानंतर कमाल 24 तासांत त्याबाबतच्या चाचण्यांचे अहवाल उपलब्ध होतील यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करणे.

7) प्रयोगशाळातील मनुष्यबळ व संसाधने पर्याप्त प्रमाणात उपलब्ध राहतील याची दक्षता घेणे.

8) ज्या रुग्णांच्या बाबतीत चाचण्यांचे अहवाल पॉझिटीव्ह आले आहेत, असे अहवाल संबंधित रुग्णालयाला तात्काळ उपलब्ध होतील यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

9) पॉझिटीव्ह रुग्णांबाबतची विहीत नमुन्यातील माहिती आयसीएमआर पोर्टल, सार्वजनिक आरोग्य विभागाचे पोर्टल व अन्य आवश्यक त्या ठिकाणी त्याच दिवशी अपलोड करणे.

10) निगेटिव्ह रुग्णांबाबतची एकत्रीत यादी तयार करणे व सदर यादी त्याच दिवशी संबंधित रुग्णालयांना पाठवणे.

11) ज्या जिल्हयातील रुग्णांचे नमूने अन्य जिल्हयातील प्रयोगशाळांकडे चाचणीसाठी पाठवण्यात येत आहेत अशा प्रकरणी त्या जिल्हयात नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिकारी यांचेशी समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही करावी.

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 51 ते 60 तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दिनांक 16 /07/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हाधिकारी जळगांव

**(अभिजीत राऊत)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
5. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
6. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
7. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
8. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)
9. उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.